# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०७/०९/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ३० /०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ब मधील फुटपाथ/डिव्हायडर्स दुरुस्ती व रंगकाम करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. रोशन एंटरप्रायझेस हयांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा २.५०% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेस मा.आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे, असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ३ | प्रभाग समिती ई मध्ये वॉर्ड नं. ९४ मधील गास - निर्मळ गौतमनगर येथे ४ शीटचे शौचालय बांधणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. सुभाष गुंजाळकर हयांची २.१२% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मे. सुभाष गुंजाळकर हयांच्याशी संविदा करणेस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.अजीत नाईक** |
| ४ | प्रभाग समिती ई मध्ये वॉर्ड नं. ९४ मधील गास-निर्मळ गौतमनगर येथे नरेंद्र जगताप यांचे घर ते तथास्तू यांचे घर व आतील गल्लीत पेव्हर ब्लॉक पुरविण व बसविणे कामी कमी दरांच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. टी.आर.अलकुंटे यांची १२.६२% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मे. टी.आर.अलकुंटे हयांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ५ | सन २०१६-१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. ॲनायडा एंटरप्रायजेस हयांच्या निविदेमधील भरलेले दर (वाटाघाटीने) सर्वात कमी व वाजवी आहेत. मे. ॲनायडा एंटरप्रायजेस यांना जा.क्र. वविशम/बांध/२२१/१६, दि.१०/०९/२०१६ अन्वये वाटाघाटीसाठी पत्र देण्यांत आले असून त्याच्या सोबत दि. १४/०६/२०१६ रोजी दरांबाबत वाटाघाटी करण्यांत आल्या. झालेल्या चर्चेनुसार निविदेमधील Providing RCC chamber cover on footpath करिता अ.क्र.१,२ व ३ या बाबींचे दरपृथकरण (Rate Analysis) केले असून सदर दर योग्य वाजवी असून मंजुर करणेकरीता शिफारस करणेत येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **Fixing** RCC Chamber cover on Footpath करिता अ.क्र.Aया बाबींचे दर मे. ॲनायडा एंटरप्रायजेस हयांनी आपल्या दि. ०८/०८/२०१६ रोजीच्या वाटाघाटी पत्राद्धारे दर कमी करुन कळविले आहे. सदर दर योग्य व वाजवी असून मंजुर करणेकरीता शिफारस करणेत येत आहे. मे. ॲनायडा एंटरप्रायजेस हयांनी Providing RCC chamber cover on Main Roadकरिता भरलेले दर निविदेतील अ.क्र. ४, ५, ६, ७, ८ व ९ व **Fixing** RCC chamber cover on Main Road करिता अ.क्र. B व C वे दर खूप जास्त असल्याने नामंजुर करुन फायबर झाकणे पुरविण्यासाठी निविदा मागविणेस शिफारस करणेत येत आहे. तरी फूटपाथवरील चेंबर कव्हर पुरविणेकामी अ.क्र.१,२ व ३ या बाबींचे दर व फूटपाथवरील चेंबर कव्हर बसविणेकामी अ.क्र.A या बाबींचे दर कमी व वाजवी असल्याने मंजुरीस्तव सादर व मुख्य रस्त्यावरील चेंबर कव्हर पुरविणेकामी अ.क्र. ४, ५, ६, ७, ८ व ९ या बाबींचे दर व मुख्य रस्त्यावरील चेंबर कव्हर बसविणेकामी अ.क्र. B व C या बाबींचे दर जास्त असल्याने रद्द करुन फायबर झ्ााकणे पुरविण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळावी. सदरचा प्रस्ताव संविदा करणेसाठी व निर्णयास्तव मा. स्थायी समितीवर ठेवणेस मान्यता मिळावी. तरी वाटाघाटीनुसार सन २०१६-१७ करीता सर्वात कमी दराची निविदा मंजुरीबाबत तसेच सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता त्या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार नव्याने ई-निविदा प्रकिया करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक हयांनी शिफारस केलेली आहे. सदर कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. तसेच सदर मंजुर दराने अन्य पुरवठाधारक काम करणेस इच्छूक असल्यास पॅनेल नेमून त्यांचीही पॅनेलवर नेमणुक करणेंत यावी. तसेच अन्य कोणीही इच्छुक पुरवठाधारक तदनंतर काम करणेस तयार असल्यास त्यांनाही सदर कामी पॅनेलवर समाविष्ट करण्यांत यावे. या कामी महानगरपालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री.सुनील आचोळकर** |
| ६ | प्रभाग समिती एच मधील फुटपाथ / डिव्हायडर्स दुरुस्ती व रंगकाम करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. निलेश मोहन मालवाणी हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४.९९% जास्त दराने व (वाटाघाटीनंतर ३.० % जास्त दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेस मा.आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन निविदा दरास व संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे, असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ७ | प्रभाग समिती ई मध्ये वॉर्ड नं. ५८ मधील अपना आवास ते मुख्य रस्ता डांबरीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. नेवाळकर एंटरप्रायजेस हयांची ४.९९% कमी दराने निविदा प्राप्त झ्ाालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मे. नेवाळकर एंटरप्रायजेस हयांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका पेल्हार | **ठराव** :- वरील प्राप्त झालेल्या निविदेबाबत चर्चा होऊन मांडवी आठवडे बाजार कर वसूली श्री. शाहिद मेहबूब सय्यद यांची रक्कम |

| | | |
|---|---|---|
| | कार्यक्षेत्रातील मांडवी आठवडे बाजार हद्दितील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पद्धतीने देणे बाबत. | रु. ६,०६,१९९/- या निविदेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ९ | प्रभाग समिती ब पेल्हार हद्दित जनार्दन स्मृती ते यादवेश विकास विद्यालयापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे काम रद्द करणेबाबत. | **ठराव :-** वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती - ब, पेल्हार हद्दीत जनार्दन स्मृती ते यादवेश विकास विद्यालयापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे काम रद्द करुन संबंधित कामाची इसारा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदारास अदा करणेच्या ठरावास मंजुरी देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी** |
| १० | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात मानद तत्वावर त्वचारोग तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ. सचिन जीवन चौधरी, एम.बी.बी.एस., एम.डी. (Dermatology, Venereology and Leprosy) यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर त्वचारोग तज्ञ डॉक्टर म्हणून नियुक्त करणेस महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु. २,५००/- व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी अदा करणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री.सुदेश चौधरी** |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर बालरोग तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर बालरोग तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात मानद तत्वावर बालरोग तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ. अंजली गोकर्ण, एम.बी.बी.एस.,डी.सी.एच, एम.डी. (पेडट्रीशियन) यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर बालरोग तज्ञ डॉक्टर म्हणून नियुक्त करणेस महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु. २,५००/- व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी अदा करणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| १२ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर सर्जन डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर सर्जन डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ. कांचन गाळवणकर, एम.बी.बी.एस.,डी.एन.बी., (जनरल, सर्जरी) यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर बालरोग तज्ञ डॉक्टर म्हणून नियुक्त करणेस महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु. २,५००/- व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी अदा करणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |